# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. १५
# सभा क्र.१८, दिनांक ११/०७/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. ११/०७/२०२५ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. नवल किशोर राम | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा.ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि) |
| मा.पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा.प्रदीप चंद्रन | – | अति.महा.आयुक्त (इ) |
| मा.सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा.सौ.उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकुमार जगताप | – | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. संतोष तांदळे | – | मुख्य अभि.(मलनिःसारण) |
| मा. सौ. मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा. श्रीमती वसुंधरा बारवे | – | उपायुक्त, (मा.व्य.) |
| मा. श्रीमती किशोरी शिंदे | – | उपायुक्त, (भांडार विभाग) |
| मा. अविनाश सपकाळ | – | क.आ.क.सं. प्रमुख |
| मा. ॲड.निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा. डॉ. कल्पना बळीवंत | – | सहा.आरोग्य प्रमुख |
| मा.बल्लाळ | – | उप आयुक्त (सांस्कृतिक केंद्र) |
| मा.प्रशांत ठोंबरे | – | उप आयुक्त (आकाशचिन्ह परवाना) |
| मा.संदिप खलाटे | – | उप आयुक्त |
| मा.अशोक घोरपडे | – | मुख्य उद्यान अधिक्षक |
| मा. राहुल जगताप | – | माहिती व तंत्रज्ञान प्रमुख |
| मा. विजय थोरात | – | शिक्षणाधिकारी (माध्य.व तांत्रिक) |
| मा. राकेश विटकर | – | सुरक्षा अधिकारी |
| मा. गव्हाणे | – | बांधकाम विभाग |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे. प्रथम दाखल विषय घेण्यात येत आहेत.

## दाखल विषय

**विषय क्र.३१९त्वर्य**

पुणे महानगरपालिका अंतर्गत विविध विभागांचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.एस कुमार ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी (टेंडर र.रु.९९,९९,०००/- (जीएसटी विरहीत) पेक्षा ०.०१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/३२१, दि.१०/०७/२०२५ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अंतर्गत विविध विभागांचे कामकाजाकीता टिपर व पोकलेन मशीन ने एस कुमार ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (टेंडर रक्कम रु.९९,९९,०००/- पेक्षा (-) ०.०१% ने कमी) एकूण रक्कम रु.९९,९८,०००=१० (अक्षरी रक्कम नव्याणाव लाख अठ्याण्णव हजार रुपये दहा पैसे फक्त) पर्यंत (जीएसटी लागू नाही) आवश्यकतेनुमार भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस

२) पुणे महानगरपालिका अंतर्गत विविध विभागांचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेणे (निविदा क्र.७५/२०२५-२६) या निविदेचे "ब" पाकीट उघडलेपासून म्हणजेच दि.०३/०६/२०२५ पासून मे. एस कुमार ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून आवश्यकतेनुसार मनपाचे विविध विभागांचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेण्यात येत असल्याने प्रकरणी मान्यतेपूर्वी केलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणेस.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२०त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.४९०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.४९०.०० कोटी

७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/३२४, दि.११/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२१त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.२१०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.२१०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/३२५, दि.११/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२२त्वर्य**

बिबवेवाडी गंगाधाम चौक ते आईमाता मंदिर रस्त्यावरील चढ कमी करून रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Mohanlal Mathrani Construction Pvt. Ltd. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९,०९,२१,२१९/- पेक्षा २०.०१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७,२७,२७,८८३=०८ अधिक जीएसटी र.रु.१,३०,९१,०१९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.५६,५०,९४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,२९,७४०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९,१६,९९,५८७=०८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२६, दि.११/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२३त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये, आरोग्य केंद्र, दवाखाने, जलकेंद्रे, सांस्कृतीक केंद्रे, क्रीडांगणे स्मशानभुमी, मंडई, माध्यमिक विदयालये, कचरा हस्तांतरण केंद्र, मैलापाणी शुध्दीकरण केंद्र, उदयाने, वसतिगृह इत्यादी ठिकाणी 'बहुउददेशीय कामगार' पुरविणे (निविदा क्र.१/२०२५) सेवा शुल्कासहित ३वर्ष काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सुरक्षा/३२७, दि.११/०७/२०२५ चे पत्र.

१. सदर तीनही संस्थेस बहुउददेशीय कामगार पुरविणे या सर्व खात्याकडील अर्थशिर्षकामधून विले आदा करण्यास या संपूर्ण कामासाठी 3 वर्षाकरीता एकुण र.रु. १४२,५६,१२,१७०.७३/- (अक्षरी -रुपये एकशे बेचाळीस कोटी छपन्न लाख बारा हजार एकशे सतर पैसे त्र्याहत्तर फक्त) अधिक मे.शासनाकडून वेळोवेळी किमान वेतन दरामध्ये होणा-या वाढीसह खर्च करणेस.
२. पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये व इतर महत्वाच्या ठिकाणी मे. स्मार्ट सर्व्हिसंस प्रा.लि. यांना (९०० बहुउददेशेय कामगार संख्येस ३६ महिने प्रमाणे र.रु. ८१.९८.४०,८६४.९६/-). मे. सैनिक इंटेलिजन्स अॅन्ड सिक्युरिटी प्रायवेट लि. यांना (५०० बहुउददेशीय कामगार संख्येस ३६ महिने र.रु.४५,५४,६७.१४७.२०/- प्रमाणे) व मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस लिमिटेड यांना (१६५ बहुउददेशीय कामगार संख्येस ३६ महिने प्रमाणे र.रु.१५,०३,०४,१५८.५७/-), याप्रमाणे विभागुन त्यांचेकडुन एकुण १५६५ बहुउददेशीय कामगार ३६ महिने मुदतीसाठी एकुण र.रू. १४२,५६,१२,१७०.७३% (अक्षरी रुपये एकशे बेचाळीस कोटी छपन्न लाख बारा हजार एकशे सतर पैसे त्र्यास्तर फक्त) (तडजोडीने २% जास्त दराने) अधिक मे. शासनाकडून येळोवेळी किमान वेतन दरामध्ये होणा-या वाढीसह बिल आदा करणेस,
३. मे. स्मार्ट सर्व्हिसेस प्रा.लि., भे. सैनिक इंटेलिजन्स अॅन्ड सिक्युरिटी प्रायवेट लि. व मे. फिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस लिमिटेड या संस्थे समवेत करारनामा करणेस व दि.१ जुलै २०२५ पासून पश्चात कार्यादेश देणेस व दरमहा वेतन अदा करणेस.
४. मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

## कार्यपत्रिकेवरील विषय

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र.३००**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०६/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का./२०६५, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**सेवकवर्ग कडील प्रकरणे**

**विषय क्र.३०१**

धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाकडे कामास असलेले सेवक श्री.गणेश दत्ता चव्हाण, हुद्दा-सफाईसेवक (वर्ग-४) यांच्या निलंबन कालावधीची पहिली सहामाही दि.१०/०१/२०२४ ते ०९/०७/२०२४, दुसरी सहामाही दि.१०/०७/२०२४ ते दि.०९/०१/२०२५, रोजी पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/साप्र/३१४, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र.३०२**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र.४,५ मधील विविध स्मशानभूमी मधील गॅस शवदाहीन्यासाठी एलपीजी गॅस पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. Moreshwar HP Gas Agency यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९,९६,९४२/- पेक्षा ०.४०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,५६,९५४=२३ पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९९,५६,९५४=२३ (अक्षरी नव्याण्णव लक्ष छप्पन्न हजार नऊशे चौपन्न रुपये तेवीस पैसे फक्त) पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/३०७, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०३**

पुणे मनपाचे फुटओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग व वाहनतळ सबवे येथे देखभाल दुरुस्तीची कामे, सुरक्षा व्यवस्था करणे, तसेच विविध प्रकारची कामे करणे, बीआरटी साठी सुरक्षा व्यवस्था (भाग-३) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. TIRUPATI CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,४०,२५,२९२/- पेक्षा ६.९३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३०,५३,३३९=२६ अधिक जीएसटी र.रु.२३,४९,६०१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१,४६,१००/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,५५,४९,०४०=२६ (एक कोटी पंचावन्न लक्ष एकोणपन्नास हजार चाळीस रुपये सव्वीस पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०२-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/३०८, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०४**

झोन क्र.४ अंतर्गत पूर परिस्थितीच्या अनुषंगाने मुंढवा चौक, एस.एम.जोशी कॉलेज, अण्णासाहेब मगर कॉलेज, वाडकर मळा, सय्यद नगर रेल्वे गेट, रविदर्शन चौक, वैभव टॉकीज, करकरे उद्यान,काळे पडळ रस्ता, ससाणे नगर कॅनॉल जवळ येथे पावसाळी लाईन व कल्व्हर्ट संबंधित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. AKSHAD CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३,६२,३१६/- पेक्षा ३२.५७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५६,३८,७०९=६८ अधिक जीएसटी र.रु.१०,१४,९६८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,२३,४३९/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६७,७७,११६=६८ (अक्षरी सदुसष्ट लक्ष सत्त्याहत्तर हजार एकशे सोळा रुपये अडुसष्ट पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३०९, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०५**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PBP ENTERPRISES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,९९,२२१/- पेक्षा ९.९६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,०२,४९८=५९ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७२,०२,४९८=५९ (अक्षरी बहात्तर लक्ष दोन हजार चारशे अठ्ठ्याण्णव रुपये एकोणसाठ पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३१०, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०६**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नाल्यातील मलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. VAISHNAVI ASSOCIATES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,४२,२१५/- पेक्षा ३.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,५१,९४८=५५ अधिक जीएसटी र.रु.११,०७,३५१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१६,०५१/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७२,७५,३५०=५५ (अक्षरी बहात्तर लक्ष पंच्याहत्तर हजार तीनशे पन्नास रुपये पंचावन्न पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३११, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०७**

झोन क्र.४ अंतर्गत पूर परिस्थितीच्या अनुषंगाने श्रद्धानगर, गोकुळ हॉटेल, चामुंडा स्वीट्स मार्ट जवळ, येवलेवाडी, कात्रज कोंढवा रोड एस.बी.आय. बँक जवळ, जाधव नगर, वरखडे नगर, राजस सोसायटी कमानी जवळ येथे पावसाळी लाईन व कल्व्हर्ट संबंधित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्स पैकी ठेकेदार मे. HARISHCHANDRA RANGNATH ANARSE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३,६२,३१६/- पेक्षा ३२.६२०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५६,३४,५२८=५२ अधिक जीएसटी र.रु.१०,१४,२१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,२३,५४७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६७,७२,२९०=५२ (अक्षरी सदुसष्ट लक्ष बहात्तर हजार दोनशे नव्वद रुपये बावन्न पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३१२, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०८**

झोन क्र.४ मधील क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलवाहिन्या व पावसाळी वाहिन्या चॅम्पियन मशीनद्वारे सफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ramesh Annasaheb Deshmukh यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७४,९९,९१०/- पेक्षा ३८.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६४९९४४=२ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६४९९४४=२ (अक्षरी शेहचाळीस लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे चव्वेचाळीस रुपये दोन पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३१३, दि.०७/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३०९**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट गावांपैकी  आंबेगाव बुद्रुक व खुर्द गावातील मुख्य रस्ते डांबरीकरण, कॉंक्रीट करण, पावसाळी लाईनसह दुरुस्ती व विकसित करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ११ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GAWARE EARTH MOVERS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,०९,८३,०८७/- पेक्षा २५.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,५५,२९,५८२=६९ अधिक जीएसटी र.रु.२७,९५,३२५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,६८,६२०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.७१,२७५/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,८५,६४,८०२=६९ (एक कोटी पंच्याऐंशी लक्ष चौसष्ट हजार आठशे दोन रुपये एकोणसत्तर पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/३१५, दि.०८/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३१०**

पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरविणे, टोनर रिफिलिंग करणे व गरजेनुसार स्पेअरपार्ट वार्षिक दर करार पद्धतीने पुरविणे (३ वर्षाकरिता वार्षिक दर करार पद्धतीने बी-२ पद्धत) कामी निविदा मागविली असता आलेल्या ५ निविदांपैकी पात्र निविदाधारक मे. झेन्का टेक्नोलॉजीस यांची निविदा सर्वात कमी दराने असल्याने मा. महा.आयुक्त यांच्या विषयपत्रात नमूद केलेले सर्व १८७ आयटम आवश्यकते नुसार झेन्का टेक्नोलॉजीस यांचे कडून उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार खरेदी करणेस तसेच त्याप्रमाणे होणारे बिल त्यांना अदा करणेस सन २०२५-२६ करिता मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/३१७, दि.०९/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – विषयपत्रामध्ये ''**आर्थिक तरतुदीनुसार खरेदी करणेस व त्याप्रमाणे बिल अदा करणेस**'' असा जो उल्लेख केलेला आहे त्याऐवजी ''**आर्थिक तरतुदीनुसार खरेदी करणेस**'' एवढेच ठेवून बिल अदा करणेस हे शब्द वगळावेत आणि त्यानंतर विषय मान्य करा.

नगरसचिव– ठीक आहे, आम्ही तसा उल्लेख आमच्या ठरावामध्ये करतो.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३११**

घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत परिमंडळ क्र.२ मधील हद्दीत SMART PUBLIC TOILET बांधणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SPARKTECH ENGINEERING यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७२,३६,१२२/- पेक्षा १७.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९,९८,७४५=१४ अधिक जीएसटी र.रु.१०,७९,७७४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८८,७५६/- पर्यंत अशी एकूण र.रु.७१,६७,२७५=१४ (एकाहत्तर लक्ष सदुसष्ट हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये चौदा पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/३१९, दि.०९/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३१२**

पुणे मनपाचे फुट ओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग व वाहनतळ सबवे येथे देखभाल दुरुस्तीची कामे, सुरक्षा व्यवस्था करणे, तसेच विविध प्रकारची कामे, बीआरटी सुरक्षा व्यवस्था करणे (भाग-२) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PARVATI INFRA PROJECT यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,३६,९७,४३६/- पेक्षा २२.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०६,७०,३०२=६४ अधिक जीएसटी र.रु.१९,२०,६५४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.९,७७५/- पर्यंतअधिक विमा शुल्क र.रु.२,७३,९४८/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,२७,३७,७०५=६४ (एक कोटी सत्तावीस लक्ष सदोतीस हजार सातशे पाच रुपये चौसष्ट पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक(०६-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/३२०, दि.०९/०७/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>मागील सभेचे विषय</u>

**विषय क्र.३१३**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – २ महिने पुढे घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३१४**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – २ महिने पुढे घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३१५**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पूरग्रस्त, गवनि पुनर्वसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सीएसओ/१३९३, दि.१८/०२/२०१९ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – २ महिने पुढे घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३१६**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सध्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१००७, दि.२२/०३/२०२१ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – २ महिने पुढे घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३१७**

पुणे शहरातील हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाउस, सर्विस अपार्टमेंट कर आकारणी बाबत खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/१०३४, दि.१३/१२/२०२३ चे पत्र.

१) पुणे शहरातील खासगी मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या बिगरनिवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३२ चे तरतुदीस अधीन राहून शासन मान्यताप्राप्त तसेच धर्मदाय नोंदणीकृत शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था यांचे मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या निवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – २ महिने पुढे घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यानंतर करण्यात यावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र.३१८**

वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पडीक हद्दीची (झाडणकाम) दैनंदिन स्वच्छता करणे या कामाचे ठेकेदार मे. एल.व्ही.जी. फॅसिलीटीज इंडिया प्रा.लि. यांचेकडून झाडण काम करणे करिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील नवीन निविदेचा कार्यादेश होईपर्यंत मुदतवाढ देणेस, वाढीव कार्यादेश देणेस व त्यांचेबरोबर वाढीव करारनामा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.४/३१६, दि.०८/०७/२०२५ चे पत्र.

१. वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पडीक हद्दीची (झाडणकाम) दैनंदिन स्वच्छता करणे(निविदा क्र.PMC/ZONE-4/WANAWADI/2023/5-EX या जुन्या कामाच्या निविदे मधून नवीन कामाचे कार्यादेश होईपर्यंत ठेकेदार मे. एल. व्ही. जी. फॅमिलीटीज् इंडिया प्रा. लि. यांचेकडून ०.००% अॅटपार (जुन्या दराने) दराने वाढीव झाडणकाम करून घेणेस.
२. वाढीव कामाचे बिल अदा करणेस.
३. तदनुषंगाने मे. एल. व्ही. जी. फॅसिलीटीज् इंडिया प्रा. लि. यांना वाढीव कामाचे कार्यादेश देणेस
४. मे. एल. व्ही. जी. फॅसिलीटीज् इंडिया प्रा. लि. यांचेशी वाढीव कामाचा करारनामा करणेस

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. १८/०७/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**